**सरकारतर्फे साक्षीदार कमांक –०३**

**मी शपथेवर खरे सांगतो की,**

**माझे नाव :** वासुदेव तुळशिराम जयपुरकर
वय – ४५ वर्षे, व्यवसाय – ना.पो.शी., पाचपावली पो. स्टेशन,
राह. सुदाम नगरी, दिघोरी, नागपूर.

**सरतपासणी सरकारतर्फे सहायक सरकारी वकील कु. आर. व्ही. चरडे यांचेमार्फत शपथेवर सुरू.**

१) दि.०४.०४.२०१६ रोजी मी लकडगंज पोलीस स्टेशन येथे पोलीस शिपाई म्हणून कार्यरत होतो. पी.आय. माने साहेबांनी प्रतिबंधात्मक कार्यवाहीसाठी पोलीस पथक नेमले होते. त्या पथकात ए.पी.आय. मोले, डब्ल्यू.पी.सी. सुशिला आणि मी होतो. आम्ही गस्त घालण्यासाठी गंगा जमुना परिसरामध्ये ०४.०० ते ०५.०० वाजताच्या दरम्यान गेलो होतो. बांगडे गल्ली येथे एक महिला लोकांना हातवारे व अश्लील ईशारे करीत असतांना दिसून आली. तेथे उपस्थित असलेल्या महिला कर्मचारीच्या सहायाने त्या महिलेला ताब्यात घेतले. वरीष्ठ अधिकारी माने यांना तेथे बोलावले. तिच्याकडे चौकशी केली. तिने तिचे नांव रिना सांगितले. त्यानंतर महिला पोलीस कर्मचारी यांनी एका खोलीमध्ये त्या महिलेची अंगझडती घेतली. तिने वेश्या व्यवसाय तिच्या आर्थिक फायदयासाठी करीत असल्याचे सांगितले. तसेच तिने सांगितले की, मुन्नीबाई नावाच्या महिलेच्या खोलीमध्ये ती वेश्या व्यवसाय करीत असुन त्यापासुन मिळालेल्या उत्पन्नामधून तिला पैसे देते.

२) जेथून त्या महिलेस ताब्यात घेतले त्याचा घटनास्थळ पंचनामा केला. घटनास्थळ पंचनामा माझ्या समक्ष करण्यात आला होता. आता मला दाखविण्यात आलेला घटनास्थळ पंचनामा हा तोच आहे. त्यावर पंचांची, आरोपीची आणि मोले साहेबांची सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. तो नि.क्र.१७ वर आहे. त्यावरुन आरोपी विरुध्द रिपोर्ट दाखल करण्यात आली. आरोपींना मी ओळखू शकत नाही. घटनेस बरेच वर्ष झाल्यामुळे मी आरोपींना आज रोजी ओळखू शकत नाही.

**सरतपास संपला.**

**<u>उलट तपास आरोपी तर्फे ॲड. एन.एम. राउत.</u>**

३ ) हे म्हणने खरे आहे की, गंगा जमुना परिसरातील लोकवस्ती दाट आहे. हे म्हणने खरे आहे की, तेथे एक पोलीस चौकी आहे. हे म्हणने खरे आहे की, माझे बयाण घेण्यात आले नाही. हे म्हणने खरे आहे की, ज्या लोकांना हातवारे केले त्या लोकांनी तक्रार दिली नाही. हे म्हणने खरे आहे की, तेथे कोणत्या नागरीकांची घरे आहे हे मला माहिती नाही. हे म्हणने खरे आहे की, गस्त घालत असतांना पी.आय. अथवा त्या समान अधिकार पद असलेले अधिकारी नव्हते. हे म्हणने खरे नाही की, पंचनामा आधीच तयार केला होता. हे म्हणने खरे नाही की, आरोपीने स्वत:च्या आर्थिक फायदयासाठी सदरचा व्यवसाय करतो असे म्हटले होते. हे म्हणने खरे नाही की, आरोपीने ती मुन्नीबाईला तिची खोली वापरण्याचे व वैश्या व्यवसायाचे पैसे देते असे सांगितले नाही. हे म्हणने खरे नाही की, मी गस्त घालण्यासाठी तेथे हजर नव्हतो. हे म्हणने खरे नाही की, वरिष्ठ

अधिका-यांच्या दबावाखाली मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलट तपास पूर्ण.**

**फेरतपास–काही नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत

समक्ष

(टी.एम.देशमुख–नाईक)
१७ वे सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर,
तथा अति. मुख्य न्यायदंडाधिकारी,
नागपूर.

नागपूर.
दि.१६/०६/२०२३.

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file of evidence are word to word same as per original evidence.

Name of Stenographer : A.P. Dharmik